“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। अनायासेन मरणम् विनादैन्येन जीवनम्।।

मूल्य रु. ५

क्रमांक २ वर्ष : ३९ जुलै-सप्टेंबर २०१९

BOOK POST

TO,

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# विवाहाच्या तीन महिने आधी

## (१९६४)



अरुण भास्कर कसबेकर



कु. प्रभा नीळकंठ पिकळे

# विवाहाच्या ५५व्या वाढदिवशी

## (३० मे, २०१९)



# संपादकीय

## कैवल्यपूर मठाधिपती श्रीमद् शिवानंद सरस्वती स्वामीजींच्या दीक्षानुग्रहाचे रौप्य महोत्सवी वर्ष

१९९४ साली तत्कालीन कैवल्यपूर मठाधिपती श्रीमद् सच्चिदानंद सरस्वती स्वामीजी यांच्यातर्फे श्री मंगेश व श्री शांतादुर्गा देवस्थानाचे पदाधिकारी व कित्येक मान्यवरांच्या उपस्थितीत कुमार गोविन्द सोमनाथशास्त्री संझगिरी यांना माघ कृ पंचमी, २ मार्च १९९४ रोजी संन्यास दीक्षानुग्रह देण्यात आला आणि त्यांचे नामकरण पट्टशिष्य श्रीमद् शिवानंद सरस्वती स्वामीजी असे करण्यात आले.

संन्यास दीक्षेनंतर गुरुमहाराजांच्या कृपा छत्रांत त्यांना शास्त्रींमार्फत वैदिक शिक्षण प्राप्त झाले. ३ मार्च २००५ रोजी श्रीमद् सच्चिदानंद सरस्वती स्वामीजी समाधिस्थ झाल्यावर १६ मार्च रोजी श्रीमद् शिवानंद सरस्वती स्वामीजींचा पीठारोहण समारंभ झाला व ते ७७ वे मठाधिपती झाले. त्यांनी आपल्या कारकीर्दीत मठाच्या वास्तूचा जीर्णोद्धार केला. तसेच बऱ्याच ठिकाणच्या मठवास्तूंचा जीर्णोद्धार त्यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. कवळें येथील ३५० वर्षाहून अधिक पुरातन अशा विठ्ठल राई रखुमाई मंदिराचेही त्यांनी नूतनीकरण केले व गोमंतकांत प्रति पंढरपूर उभारले.

माघ कृ. पंचमी २३ फेब्रुवारी २०१९ रोजी स्वामीजींच्या दीक्षानुग्रहाला २५ वर्षे झाली. त्यानिमित्त वाळकेश्वर येथील मठातर्फे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात स्वामीजींच्या उपस्थितीत विविध धार्मिक उपक्रम झाले. २६ मे रोजी सकाळी महागणहोम करण्यांत आला. संध्याकाळी दादर येथील एका सभागृहांत अनेक मान्यवर शिष्यगणांच्या उपस्थितींत वाळकेश्वर मठाचे कार्यवाही अध्यक्ष श्री. भूषण जॅक यांच्या हस्ते स्वामीजींची पाद्यपूजा करण्यात आली नंतर स्थानिक शिष्यवर्गातील कलाकारांतर्फे सुमधुर भक्तीसंगीत सादर करण्यांत आले व नंतर स्नेहभोजनाने स्वामीजींच्या हृद्य स्वागत समारंभाची सांगता झाली. २७,२८,२९ रोजी मठांत विविध देवकृत्ये करण्यांत आली. शेवटच्या दिवशी २९ तारखेला नवचंडी हवन झाले व स्वामीजींच्या आशीर्वचनाने सत्कार सोहळ्याची समाप्ती झाली.

द.ना.नाडकर्णी

**श्रावणातला महिला मेळावा संबंधीच्या कार्यक्रमाचा तपशील पृ. १९ वर**

# एज्युकेशन सोसायटी : गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे दिली जातात. त्यानुसार यंदाही २४ नोव्हेंबर २०१९ रोजी भरणाऱ्या स्नेहसंमेलनांत बक्षिसे दिली जातील. बक्षिसांची पात्रता पुढील प्रमाणे :

| **परीक्षा** | | **किमान पात्रता** |
|---|---|---|
| **दहावी** | | ८०% |
| **बारावी –** | **विज्ञान** (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| | **वाणिज्य** | ७०% |
| | **कला** | ६५% |
| **पदवी व सरकारमान्य डिप्लोमा** | | ६०% |
| **एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी,** | | उत्तीर्ण |
| **परदेशांत घेतलेली पदवी** | | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

## अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १ ऑक्टोबर २०१९

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, Email व संपूर्ण पत्ता. The NKGSB Ind & Education Society, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai 400004. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- ☐ विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असल्या पाहिजेत.
- ☐ बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
- ☐ ज्या डॉक्टर्सनी एम्.एस्. किंवा एम्.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.
- ☐ गेल्या वर्षी काही परीक्षांचा निकाल उशिरा लागला होता. तेव्हा संबंधित गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनीही अर्ज पाठवावे.

## प्रकाशझोत

### शतकवीर श्रीमती शोभना वागळे यांचा संघ व एज्युकेशन सोसायटीतर्फे सत्कार

अंधेरी (पू) येथे राहणाऱ्या श्रीमती शोभना घनश्याम (गजाभाऊ) वागळे (पूर्वाश्रमीच्या सुशीला राघवेन्द्र दिवेकर) यांना २१ जून रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त संघाचे व एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी सर्वश्री मारुती दळवी, शिरीष वाघ, देवदास नाडकर्णी, विवेक कुलकर्णी व मुखपत्रिकेचे संपादक द. ना. नाडकर्णी (सुशीलाताईचे मावसभाऊ) यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला व त्यांच्याकडून शुभाशीर्वाद घेतले. आपल्या बँकेतर्फेही त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्या शरीराने कृश झालेल्या असल्या तरी त्यांची मानसिक स्थिती व स्मरणशक्ती तल्लख आहे. आकाशवाणीवरचे व दूरदर्शनचे कार्यक्रम त्या रस घेऊन ऐकतात. मुखपत्रिकाही त्या आवडीने वाचतात. त्यांची भाची सौ. सुहासिनी वर्टी यांचे मुखपत्रिकेत अधूनमधून लेख येतात तेव्हां त्या भाचीला 'अशेच बरयत राव' म्हणून उत्तेजन देतात.

तरुण वयी त्या अत्यंत कर्तबगार होत्या. बॅडमिंटन खेळण्यांत त्या निष्णात होत्या. पेटी व दिलरुबा वाजवण्यांतही त्या वाकबगार होत्या. काही वर्षे त्या पारले पश्चिम येथे गुजराथी वस्तींत राहायच्या तेव्हां नवरात्रीला गरब्याच्या वेळी त्या ढोलकीही वाजवत. जोगेश्वरी येथील सरस्वती बागेच्या गणेशोत्सवांत त्यांनी सुहास वर्टी बरोबर एकांकिकाही सादर केली होती. तेथील वनिता वृंद या संस्थेच्या त्या कित्येक वर्षे सक्रीय सभासद होत्या. त्यांच्या प्रचंड ओळखीमुळे व वाक्चातुर्याने अनेकांचे विवाह जुळलेले आहेत.

### सिमेंट व लोखंड विना घरे बांधणारी तज्ज्ञ प्रियांका गुंजीकर

गेल्या पिढीतील शिक्षणखात्यातील गुंजीकर इन्स्पेक्टर बहुतेकांना परिचीत होते. त्यांची नात व नेरुळ येथे वास्तव्याला असलेले सौ. सुमित्रा व श्री. श्रीकांत गणेश गुंजीकर यांची केवळ २७ वर्षाची कन्या प्रियांका ही व्यवसायाने सुवर्णपदक विजेती आर्किटेक्ट आहे. ती आपले पती ध्रुवांग हिंगमिरे यांच्या सोबत सिमेंट व लोखंड यांचा वापर टाळून पर्यावरणपूरक वास्तूंची उभारणी करण्यात तज् ज्ञ आहे. माती, चुना, लाकूड, विटा इत्यादी स्थानिक उपलब्ध घटकांचा वापर करुन जुन्या परंपरागत बांधकाम तंत्राच्या साहाय्याने ते दोघे घरे उभारतात. पर्यावरणाला होणाऱ्या बांधकामाचा प्रसार करण्याचे उभयतांचे स्वप्न व उद्दिष्ट आहे. अशा घरांची भूकंपाने पडझड व्हायची शक्यता कमी असते. भूकंपाने हानी झालीच तरी त्याची तीव्रता सिमेंटच्या इमारती कोसळून होणाऱ्या हानीपेक्षा कमी असते. पडझडीनंतर मातीच्या घरांचा कचरा जमिनींत मिसळून जातो. तर सिमेंटच्या घराच्या कचऱ्याचे नीट विघटन होत नाही.

स्थानिक कामगारांकडून परंपरेने आलेल्या बांधकाम कलेचा उपयोग करण्याचा प्रियांकाचा भर असतो. त्यामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होतो व खर्चाचीही बचत होते.

प्रियांका व ध्रुवांग यांच्या नवीन्यपूर्ण प्रकल्पांची दखल घेऊन स्टार माझा व चॅनेलनीही त्यांची मुलाखत घेतली होती.

**कृषांग बोरकर याला डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत रौप्य पदक**

डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धापरीक्षा राज्य स्तरावर इयत्ता ६ व ९ मधील विद्यार्थ्यांसाठी असते. त्या स्पर्धेत महाराष्ट्रासह विविध राज्यांतून ५० हजारहून अधिक विद्यार्थी सहभागी होतात. परीक्षा ४ टप्प्यांमध्ये घेतल्या जातात. प्रथम लेखी, नंतर प्रात्यक्षिके त्यानंतर संशोधन प्रकल्प व शेवटी मुलाखत. अंधेरी येथे राहणारे श्री. वामन दत्तात्रय बोरकर यांचा नातू चि. कृषांग नीलेश बोरकर २०१५-१६ या वर्षी सहावीत असतांना त्याला या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले होते. अलीकडे २०१८-१९ या वर्षी नववीत असतांना त्याला रौप्य पदक मिळाले. त्याच्या या उज्ज्वल यशाबद्दल त्याचे अभिनंदन.

## ठाणे मंच
## येणार का कुर्ग - कारवार परिसरात सहलीला

आमच्या हितचिंतक ज्ञाति बांधवांच्या खास आग्रहास्तव आम्ही कर्नाटक सहल आयोजित केली आहे.

**- सहलीची रुपरेषा -**

| | | |
|---|---|---|
| **मुंबईवरुन निघणार** | - | १३ सप्टेंबर २०१९ - मत्स्यगंधा एक्सप्रेस |
| **मुंबईस परतणार** | - | २३ सप्टेंबर २०१९ - मत्स्यगंधा एक्सप्रेस |
| **भेट देण्याची प्रमुख ठिकाणे** | - | कुर्ग - शिरसी - कारवार |
| **सहलीचा खर्च साधारण** | - | रु. २५०००/- अधिक रेल्वे भाडे |
| **नोंदणी शुल्क** | - | रु. ४२००/- |
| **सहकार्य** | - | अनुभव हॉलीडेज प्राईव्हेट लि. |

- कार्यक्रमात फेरफार होऊ शकतो.
- लोअर बर्थ प्रत्येकास मिळेल याची खात्री नाही.
- पैसे भरल्या नंतर अनुभवचे नियम लागू होतील. ठाणे मंच जबाबदार राहणार नाही.
- आपल्या बँकेच्या नौपाडा ठाणे शाखेत खाते क्र. १८१६ मध्ये पैसे भरण्याची सोय.

सुरेश पालेकर ९९६९४५५३७०/८९२८८५०१९३
अरुण वाघ ९८२०३७७१०२
राजेश दिवेकर ९६१९३६२४६०

# कारवारकरांचा लाडका नातू पु. ल. यांच्या जन्मशताब्दी निमित्त वाचकांच्या हृद्य आठवणी

## १

'माझे बालपण जागविणारे सदाशिवगड' या पु.लं.च्या लेखांत त्यांनी माझे वडील डॉ. कृष्णराव वाघ यांचा उल्लेख केला आहे. "सदाशिवगडला मी आणखी एक गोष्ट शिकलो. कृष्ण डॉक्टरांच्या दवाखान्याजवळचे ते भाड्याने सायकली मिळायचे दुकान आजही माझ्या डोळ्यांपुढे उभे आहे". काही वर्षापूर्वी मी पारले येथे पुलंच्याच एका नातेवाईकाच्या विवाहाच्या स्वागत समारंभाला गेले होते. तेव्हां मी पण तेथे होते. कुणीतरी माझी पुलंशी 'कृष्ण डाक्टराली चली' अशी ओळख करुन दिली. काही मिनिटे ते माझ्याशी अपुर्बायेने बोलले सुद्धा. नंतर काही महिन्यांनी ते गोव्याला गेल्यावेळी माझा तेथील पत्रकार भाऊ जगदीश (जगलू) यांच्याशी त्यांची भेट झाली. माझ्या भावाने 'कृष्णडाक्टरालो चलो' म्हणून आपली ओळख करुन दिली. पुलंनी लगेच त्याला तुझी बहीण आपल्याला एका लग्नात भेटली होती याची आठवण करुन दिली. एका असामान्य व्यक्तीने माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीची आठवण ठेवली हे ऐकून माझ्या अंगाला रोमांच आले. ही माझ्या वडिलांचीच पुण्याई असे म्हणायला पाहिजे.

**अनुपमा व्यंकट कामथ, गोरेगांव**
**(पूर्वाश्रमीच्या कुंदा कृष्णराव वाघ) २८२१३७२३**

## २

'किशोर' या मासिकाच्या दिवाळी १९७८ च्या अंकात पु.लं.चा 'बालपणीचा काळ सुखाचा' हा लेख छापून आला होता. त्यांत जोगेश्वरी येथील कारवारकरांच्या सरस्वती बाग उर्फ सोसायटी येथील त्यांच्या बालपणीच्या आठवणी आहेत.

या लेखांत पु.लं.नी माझे वडील डॉ. सलगर यांचाही उल्लेख केला आहे. माझे वडील डॉ. सदाशिव विठ्ठल सलगर हे राजाभाऊ म्हणून परिचित होते. ते १९२३ साली सोसायटीत वास्तव्याला आले. आम्ही सलगर कुटुंब सोसायटीतले सर्वांत जुन्या रहिवाशापैकी एक आहोंत. माझे वडील पु.लं.चेच नव्हे तर, भाईमहाराज व दादाभाई टाकी महाराज यांचेही फॅमिली डॉक्टर होते. पु.ल. हे इस्माईल कॉलेजचे विद्यार्थी. कॉलेजच्या ५० व्या वर्धापनदिन सोहळ्या निमित्ताने ते पारले येथे आले होते. तेव्हा माझी त्यांच्याशी भेट झाली व मी डॉ. सलगरांचा मुलगा म्हणून ओळख करुन दिली. त्यांनी लगेच राजाभाऊंचा मुलगा म्हणून माये मॉगाने मला जवळ घेतले. माझ्या आनंदाला पारावारच नव्हता. मी त्यांना वांकून नमस्कार केला व त्यांचा आशीर्वाद घेतला. हा क्षण मी आयुष्यात कधीच विसरणार नाही.

**डॉ. रमेश सदाशिव सलगर, सरस्वती बाग**
**२८२४६३१४/ ९९३०२१४४७६**

# जुन्या पिढीतील लग्नसोहळ्याची कहाणी

मी आपल्याला सत्तर वर्षांमागे नेत आहे. त्यावेळेस सदाशिवगड कारवार येथे ५–६ वाडे होते. त्या वाड्यांची नावे दिवेकरवाडा, वाघवाडा, वर्टीवाडा, गंडभीरवाडा, पिंगेवाडा अशी होती त्या घरांमध्ये म्हातारे आजोबा व आजी रहायचे व घरची शेती, गुरे आणि फळबागा सांभाळायचे. त्यांची मुले मॅट्रीक व ग्रॅज्युएट होऊन मुंबईत नोकरी करायची व सुट्टीत आजोबांच्या घरी यायची. तरुण माणसे सर्व, मुंबईत रहायची. आणि लग्न कार्ये सदाशिवगडास व्हायची. ही लग्ने एप्रिल मे या दरम्यान उन्हाळ्याच्या सुट्टीत व्हायची. ज्यांची घरे होती. ती आपल्या घरीच लग्नकार्ये करीत. तशा इतर सुविधा आचारी वगैरे गावात होत्या. घरासमोर मांडव घालून मंडपात लग्ने व्हायची. ज्यांची घरे मोठी नव्हती, त्यांची लग्ने ज्यांची मोठी घरे आहेत, तिथेच व्हायची आणि तिथे राहणारी माणसे त्यांची घरे स्वखुशीने देऊन सर्वतोपरी मदत करायची. लग्नकार्यास घरची माणसे १५–२० असायची. एका वाड्यात नवरदेवाकडील माणसे व दुसऱ्या वाड्यात नवरीकडील माणसे रहायची व घरातील मालक मंडळी आनंदाने घरे द्यायची.

अशी २–३ लग्ने आमच्या घरी कणसगिरीला झाली. त्यावेळेस मी ८–१० वर्षाचा असेन. माझ्या आठवणीप्रमाणे आमच्या आजीच्या घरात (दिवेकरमास्तर) कोणीतरी बोरकर कुटुंबाच्या मुलाचे लग्न होते. मिठा शांता असावेत. कन्या गंडभीर घराण्यातील होती. ते लोक गंडभीरवाडा कणसगिरी येथे उतरले होते. त्यांच्या नात्यातली माणसे श्री. के. जी. वर्टी, श्री. एस्. जी. वर्टी, गंडभीर कुटुंब, पोरीवर्टी, बोरकर मामलेदार असे लोक उपस्थित होते.

ठरलेल्या मुहुर्ताप्रमाणे लग्नाच्या दिवशी नवरदेव डोलीतून कणसगिरी दिवेकर मास्तरांच्या घरासमोर आला. तिथे सिमोल्लंघन झाले. यजमानांनी नवरदेवाला धरुन मंडपात आणले. विवाहाचा मंडप केळीच्या गाभ्याने, आंब्याचे ताळे यांनी छान सजवला होता. मुहुर्ताप्रमाणे लग्न व्यवस्थित पार पडले.

दुसऱ्या दिवशी फोटोसेशन झाले. ते काम शिवराम नाडकर्णी यांनीच करायचे असायचे ते आले. प्रथम बाके वगैरे लावून व्यवस्थित मांडणी केली. त्यांनी आमंत्रित केल्यावर सर्व मंडळी आली. नवरा–नवरी सजून थटून मध्यभागी खुर्चीवर बसले. वरिष्ठ मंडळी त्यांच्या आजुबाजुला बसली त्यांच्या मागे जुनी जोडपी उभी राहीली. सर्व मुले मुली मांडी घालून समोर बसली. संध्याकाळी फोटोसेशन संपल्यावर फोटो ८–१० दिवसांनी मिळावयाचा होता. दुसऱ्या दिवशी हनिमुन सेशन. हे काम तेथील अनुभवी व्यक्ती हातात घ्यायची ती बहुतेक महिला

असायची. पहिला कार्यक्रम 'मुदी मुदी सुपारी'. मोठ्या भांड्यात (तोपात) कुंकवाचे पाणी करुन नवरा नवरी समोरासमोर मांडी घालून बसायचे. वडील पुरुष हातात सुपारी व अंगठी (मुदी) घेऊन त्यांच्या समोर उभे राहून अंगठी त्या पाण्यात टाकायचे. टाकताना 'मुदी मुदी सुपारी' म्हणायचे. दोघा नवरानवरीनी हाताने झटापट करुन अंगठीचा शोध घ्यायचे आणि ज्याला ती अंगठी मिळेल ती त्याची व्हायची. बहुतेक वेळा ती नवऱ्या मुलीला (व्होकल) मिळायची. कारण ती नवऱ्याच्या हाताला चिमटे काढून अंगठीचा ताबा घ्यायची. नवरा मुलगा मात्र 'हाय हाय' म्हणत रहायचा. हे झाल्यानंतर नवऱ्या मुलीला लपवून ठेवायचे. ह्यासाठी नवरीला मोठे 'भांड' मध्ये लपवून ठेवायचे किंवा जुन्या कपाटात लपवायचे. नवरा मुलगा नाटक केल्याप्रमाणे करुन नवरीला शोधून काढायचा.

यानंतर महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे विडा तोडणे. या कार्यक्रमाला नवरी मुलगी पानाचा विडा तोंडात धरायची हा कार्यक्रम पाहण्यासाठी सर्व बायका, पुरुष खच्चून भरलेले असायचे. एकदा नवरदेवाने विडा तोंडात धरायचा व नवरीने तोडायचा. त्यानंतर नवरीने विडा तोंडात धरायचा व नवरदेवाने तोडायचा हा कार्यक्रम झाल्यावर 'हनिमून' संपला.

लग्नाच्या ह्या गडबडीमध्ये महत्त्वाचे जेवण खाण्याबद्दल लिहायचे राहून गेले. त्यावेळेस गावात 'शाबीमामा' नावाचा एक 'रानपी' होता. लग्नमुंजीच्या सीझनमध्ये तो भेटणे दुरापास्त असे. रोज ५० ते ६० लोक त्याचे जेवण जेवायचे. जेवण म्हणजे पत्रावळी किंवा पानावर जेवणाच्या पदार्थांमध्ये लाल रंगाचा भात, वडे, मुगा-आंबट (ओले काजू बिया घालून) लाल भोपळा घालून खतखते, वांग्याचे भरीत, पापड-सांडगे, डाळीचे तॉय Sweet dish म्हणून म्हणून मडगणे किंवा पायस असे. जेवण झाल्यावर मस्तपैकी झोप काढायची. सकाळी Breakfast ला कसाय, लाल पोहे (धुवण दिलेले), बुंदीचे लाडू, चिवडा, शेव वगैरे असायचे. चहा फक्त मुंबईकरांना मिळायचा. घरच्या लोकांना कसाय.

४-५ दिवसांनी लग्नकार्य संपल्यावर परत जाण्याची हालचाल दिसायची नाही. घरातील कर्ती माणसे 'उद्या रवानगीचे जेवण' असे जाहीर करायची म्हणजे सगळे समजून जात की आपण आता निघाले पाहीजे. या जेवणात माशांची आमटी, भात पापड लोणचे एवढेच असे. हे जेवण झाल्यावर सर्वांची परतण्याची घाई सुरु होई. यानंतर काही वर्षांनी लग्नकार्ये, मुंजी वैगेरे मुंबईत साजरी होऊ लागल्यावर गावात लग्न होणे संपुष्टात आले.

ह्या लेखात काही चुकभूल झाली असल्यास माफी असावी.

**श्री. मोहन विश्वनाथ दिवेकर, पुणे**

# SAD DEMISE



**SHRI. SADANAND RAMKRISHNA ( BABUTMAM ) NADKARNI**

**( 10 / 3 / 1928 TO 1 / 5 /2019 )**

PLACE OF RESIDENCE: KANDIVALI –EAST

BIRTH PLACE : KARWAR


**MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD**

MSIPL

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058

Tel No. 022-4233 3323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 33444




Can we help you to achieve your goal???

& your goal is...

Let's reach nearer

To your highest GOAL!!!

Step by step....




A little every month grows to something significant over time!!

Invest Rs.1000/ Per month & get...

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




*Indian Equity market has given avage 16% return s in last 32 year s...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# ठाणे मंचची ज्येष्ठ नागरीक सहल

दरवर्षीप्रमाणे या वेळीहि ठाणे मंच आयोजित ११ ते १२ एप्रिल २०१९ रोजी पालघर तालुक्यातील केवळे माहीम येथील 'शांतशील रिसॉर्ट' येथे सहल आयोजित करण्यात आली.

नेहमीप्रमाणे माहीम वरुन बस अंधेरी मुलुंड व ठाणे येथे आली व ठाण्याहून ठीक सकाळी ८.३० वाजता सुटली बसमधील चविष्ट नास्त्याचा आस्वाद घेत घेत व गप्पागोष्टी करत आम्ही पालघरला कधी पोहचलो ते कळलेच नाही. ठीक सकाळी ११ वाजता आम्ही रिसॉर्टवर पोहोचलो.

'शांतशील रिसॉर्ट' नावाप्रमाणेच तिकडचे वातावरण शांत आणि शीतल होते. हे 'रिसॉर्ट' झाडीमध्ये वसलेले आहे आजूबाजूला दाट झाडी असून राहाण्यासाठी खोल्या बांधण्यात आल्या आहेत. हवा इतकी चांगली होती की ग्रीष्म ऋतु आहे असे वाटतच नव्हते सर्वांनी १२-१२.३० पर्यंत आराम करुन १ वाजता व्हेज व नॉनव्हेज जेवण घेऊन ४ पर्यंत आराम केला. नंतर चहा अल्पोपाहार घेऊन ५ वाजता बाहेर पडलो. 'शितलादेवी' व 'मारूती' मंदिर यांचे दर्शन घेऊन तिथूनच जवळ 'केळवे माहीम बीच' वर चालत गेलो. बीचवरील वातावरण खूप आल्हाददायक होते. काहीजण पाण्यात मजा लुटायला गेली. काहीजण घोडागाडीतून रपेट करायला तर काहीजणानी तेथील बाकड्यावर बसणे पसंत केले. नंतर सर्वांनी ताडगोळ्याचा आस्वाद घेतला आणि संध्याकाळी ७.३० पर्यंत रिसॉर्टवर आलो.

रात्री ८.३० वाजता रिसॉर्टतर्फे गाण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. रिसॉर्टमधील गायक श्री 'अविनाश राऊत' यांनी करावकेवर महंमद रफी, मुकेश, किशोरकुमार यांची गाणी त्यांच्या सुमधुर आवाजात ऐकविली मग आपल्या ग्रुपमधील काही ज्येष्ठ नागरीकांनी पण गाणी गाईली. प्रथम श्री. रवी बोरकर यांनी त्यांच्या सुमधुर आवाजात 'आरंभी वंदिन अयोध्येचा राजा' 'बगळ्याची माळ फुले अजुनी अंबरात' 'ही गाणी व गुलाम अलीची 'हमको किसके गमने मारा' ही गझल पेश केली श्री. अरुण रेगे यांनी 'भवरेके गुंजन है मेरा दिल' 'रिमझिम गिरे सावन' 'इशारो ये दिल' 'मेरे मेहबूब' अशी गाणी करावकेवर गाईली तसेच सौ. मंगलाताई वागळे यांनी 'गाडी आली गाडी आली मंगेशाची' हे गाणे पेश करुन चाहत्यांची वाहवा मिळविली. सौ. ज्योती सुकथनकर यांनी हि 'अजीब दास्ता है ये' हे गाणे पेश केले व २-३ गाणी करावकेवर श्री. अविशान राऊत यांच्याबरोबर गाईली व शेवटी श्री. रवी बोरकर यांनी संत तुकाराम महाराजांची 'जातो माघारी पंढरीनाथा' या भैरवीने सांगता केली.

त्यानंतर साग्रसंगीत जेवण सर्वांनी घेतले. आपल्या सर्वांना परिचित असलेले श्री. देसाईमामा यांनी दरवर्षीप्रमाणे यावेळीही रु. ५००० त्यांच्या अर्धांगिनी सौ. अपर्णा देसाई

यांच्या नावे देणगी देण्याचे जाहीर केले.

पुढील वर्षापासून होणाऱ्या ज्येष्ठ नागरीक सहलीसाठी हिवाळ्यातील सहली सोडून 'Air Condition' बसची व्यवस्था ठाणे मंच मार्फत केली जाईल अशी घोषणा श्री. सुरेश पालेकर यांनी केली व सर्वांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले आणि १०.३० वाजता सर्वजण झोपायला गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता नास्ता करुन काहीजणानी रिसॉर्टवर आराम करणे पसंत केले दर शुक्रवारी आठवड्याचा बाजार भरतो असे कळल्यावर सर्व महिला खरेदीसाठी बसने गेल्या. सफेद कांदे, चिंच, वाल, सुकी मासळी अशी खरेदी करुन ११.३० पर्यंत परत आलो व १२ वाजता 'हाऊजी' हा खेळ खेळलो नंतर १.३० वाजता दुपारचे जेवण घेऊन ३ वाजता मुंबईत परत येण्यास निघालो. वाटेत ५ च्या सुमारास ठाणे मंचनी सर्वाना चहा व पॅटीस देऊन संध्याकाळच्या नास्त्याची पण सोय केली. परतीच्या प्रवासात श्री. अरुण कसबेकर यांनी २-३ विनोद सांगितल्यामुळे सर्वजण फ्रेश होऊन आपापल्या घरी आनंदाने या सहलीच्या आठवणी घेऊन परतलो.

श्री. राजेश दिवेकर, श्री अरुण वाघ, श्री. दुर्गादास रेगे व श्री. सुरेश पालेकर यांच्या मेहनतीमुळे सहल यशस्वी होण्यास मदत झाली.

Three cheers to them and Thane Manch.

**सुषमा सुबोध मुळगांवकर**
९८१९८३६४७६

## श्रद्धांजली

### कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)

३४ वे पुण्यस्मरण - निधन : रविवार २८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३४ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**श्री. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी**
**यांच्या तर्फे**

# ठाणे मंचतर्फे निमंत्रण

## वर्धापन दिना निमित्त सत्यनारायण पूजा,
## हळदी कुंकू समारंभ आणि सांस्कृतिक कार्यक्रम

ठाणे मंच आता २३ वर्षे पूर्ण करुन २४ व्या वर्षात पदार्पण करत आहे. हा आनंद साजरा करण्यासाठी चला तर जमुया आणि विविध कार्यक्रमांचा आस्वाद घेऊ या.

**तारीख** : रविवार दि. ११ ऑगस्ट २०१९

**वेळ** : संध्याकाळी ४ ते ८।।

**स्थळ** : सुयोग सोसायटी सभागृह, संत ज्ञानेश्वर पथ,
मुलुंड (पूर्व), मुंबई–४०००८१.

- नृत्य, संगीत व तत्सम कलांचा आविष्कार सादर करावयाचा असल्यास संपर्क साधावा. वयाची अट नाही.
- पूजेची आरती साधारण ४।। वाजता होईल.

**कलाकारांनी त्वरीत संपर्क साधावा**

| सुरेश पालेकर | अरुण वाघ | राजेश दिवेकर |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९८२०३७७१०२ | ९६१९३६२४६० |
| ८९२८८५०१९३ | | |

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व
## ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

**नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनाात २०१९ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांला उपकृत करावे.**

**१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.**

# प्रतिक्रिया
## सोसायटीची वैनी

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात जोगेश्वरी येथील ‘सोसायटीच्या वैनी श्रीमती इंदिरा तेलंग’ यांच्या विषयी उल्लेख आला होता. त्या आमच्या घराजवळ ‘आठ’ नंबरमध्ये रहायच्या. त्यांचे दोन्ही मुलगे सोसायटीतील इतर मुलांशी मिळून मिसळून वागायचे. आमच्या वडिलांनी आम्हाला एकदा सांगितलं की ‘कृष्णाबाय’ माझ्या चुलतभावाची (जिवण्णाची) मुलगी हे ऐकून मला आकाश ठेंगणं झालं कारण सोसायटीची वैनी ही माझी बहीण आहे. माझ्या सुस्वभावी, प्रेमळ आईवडिलांची ती खूप आदर करायची कारण माझ्या आईने तिला संकटात मदत केली होती.

निसर्ग नियमाप्रमाणे मी मोठी झाले कॉलेजमध्ये गेले. १९६१ ची गोष्ट, मी कॉलेज परिसरात असलेल्या वि. मा. दी पटवर्धनांकडे गेले होते. बोलता बोलता काकूंनी विचारले ‘पोरी’ तुमच्या सोसायटीत महिला मंडळ आहे का ? मी नाही सांगितलं. तेव्हा त्या म्हणाल्या चल माझ्याबरोबर. नंतर आम्ही प्रि. पु. शि. रेगेंच्या सौ. ना घेऊन सौ. इंदिरा बाळकृष्ण नाडकर्णी, सौ. इंदिरा तेलंग, विजूताई (वाघ) तेलंग यांच्याकडे गेलो. अशाप्रकारे कृष्णाताईने पुढाकार घेऊन ‘वनिता वृंद’ सगळ्यांमुळे सुरु झालं.

मी B.Sc. झाले. अभ्यासाचा ताण नव्हता. बाजारांत फ्लॅस्टिकच्या १-२ सेंमी रुंदीच्या पट्ट्यां मिळायच्या. मी कृष्णाताईकडे गेले आणि तिने विलंब न लावता मला शिकवलं. इतकी सुंदर बॅग की ती बघून मी मनोमनी खूष झाले.

काही वर्षानी माझं लग्न जमलं. पत्रिका वाटल्या गेल्या. आम्ही कल्पना केली नव्हती पण कृष्णाताई, कमळीताई, ताई मधुभावोजी (जोशी) या माझ्या आवडत्या आप्तानी फुले, बेसनाची फळे, बिस्किटाचा, चॉकलेटचा बंगला (ताई भावोजी) या वस्तु रुखवतासाठी बनविल्या हॉलमध्ये त्या टेबलावर मांडल्या गेल्या. कृष्णताईने बेसनाची फळे बनविली होती. माझ्या सासरचे आप्त खूश झाले. माझ्या ताईला तिने स्वेटर शिकविला होता.

आज माझ्या विवाहाला ५२ वर्षे झाली. पण हे सगळं अजून डोळ्यांसमोर दिसतं. माझ्या या सर्वगुणसंपन्न बहिणीला मी कधीहि विसरणार नाही.


**कुंदा (वागळे) कामत**
**जोगेश्वरी पूर्व**
**(२८२१३७२३)**

# ऋणको ते धनको - एक अनोखा प्रवास (४)

धनको बनण्याचे बरेच मार्ग असतात. काहीजण आपल्या असामान्य बुद्धीमत्तेने नवीन नवीन शोध लावतात व अगणित संपत्ती गोळा करतात. काहीजणांना नशीबाने सरकारी नोकरी मिळते व ती सुद्धा अगदी मोक्याच्या जागी, जेथे दिवसरात्र पैशाचा रतीब चालूच असतो. काहीजण जन्मत:च तोंडात सोन्याचा चमचा घेऊन येतात. त्यांना गरिबी, टंचाई हे प्रकार माहीतच नसतात. काहीजण, आमच्यासारखे, खाऊन पिऊन सुखी असतात पण चैन करणे, जीवाची मुंबई करणे हे प्रकार त्यांच्या कुवतीबाहेर असतात.

त्याशिवाय मोठ्या आजारपणाचा खर्च, एखादा फ्लॅट कर्ज काढून स्वत:करिता खरेदी करणे या फार मोठ्या गहन समस्या असतात. यात झालेल्या खर्चांचा सामना करण्यात कधीकधी अर्ध आयुष्य वाया जाते. काही असेही महाभाग असतात – त्यांना दैवाने वर सांगितल्याप्रमाणे बऱ्याचश्या संधी मिळाल्या असल्या तरी ते शेवटपर्यंत कोरडेच राहतात–उदा. माझे बाबा आणि काका–श्री. भास्कर (B.D.) आणि श्री. प्रभाकर (P.D.) दत्तात्रय कसबेकर.

माझे बाबा रिझर्व बँक ऑफ इंडिया (RBI), Exchange Control Department (ECD) मध्ये कंट्रोलर होते. अनेक वर्षे भारताच्या कुठल्याही भागातून जर कोणालाही परदेशगमन करावयाचे असेल तर त्यांना RBI मध्ये “P” Form भरावा लागत असे व काही काळ तर असा होता की, फक्त ECD, RBI Mumbai मध्येच “P” Form देण्यात येत असे. म्हणजेच भारताच्या कुठल्याही भागातून परदेशगमनासाठी तसेच आवश्यक परदेशी चलनासाठी “P” Form वर श्री. भास्कर दत्तात्रय कसबेकरांचीच सही लागत असे. त्याशिवाय Air Ticket तसेच Foreign Exchange मिळत नसे. मी बाबांना रात्री एक–दीड वाजेपर्यंत रोज घरी काम करताना पाहिले आहे. कल्पना करा, केवळ “P” Form वेळेवर न मिळाल्यामुळे जर मोठ्या कंपन्या, मोठा बिझनेस कॉन्ट्रॅक्टस् साकार करण्यात असमर्थ झाली तर, त्यांचे किती नुकसान झाले असते ? “P” Form लवकर मिळण्यासाठी ते काहीही करायला तयार झाले असते. महिन्याच्या तीस दिवसांत बाबांना कमीत कमी ४० तरी Cocktail / Dinner पार्टींचे निमंत्रण, तसेच Air India, KLM, PAA व इतर अनेक आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांचे “Inaugural Flight” करिता निमंत्रण–त्यात 1st class विमान प्रवास व ४–५ दिवस परदेशात Five Star हॉटेलमध्ये राहण्याची सोय ! पण एकदाही त्यांनी त्याचा फायदा घेतला नाही.

एक हृदयस्पर्शी प्रसंग मला इथे नमूद करावासा वाटतो. एकदा टेबलावर ३०–४० कार्डांच्या गठ्ठयातून, बाबा एक–एक कार्ड घेत व खुर्चीवर बसून स्वत:भोवती ते कार्ड ओवाळून खाली कचऱ्याच्या टोपलीमध्ये टाकत होते. त्यांची केबीनच्या दरवाज्याकडे पाठ होती आणि Dy. Governor श्री. रंगाचारी कधी आत आले ते त्यांना कळलेच नाही. दोन–तीन वेळा कार्ड ओवाळणीचा प्रकार बघून श्री. रंगाचारी ज्या कामाकरिता आले होते, ते विसरुन मोठ्याने

ओरडले–“हे काय चालले आहे कसबेकर ?” बाबा श्री. रंगाचारी यांना बघून जरा चपापलेच व म्हणाले– “काही नाही साहेब! मी फक्त या खुर्चीला सांगत होतो की ही सारी निमंत्रणे तुला आहेत, मला नाहीत!”

थोडक्यात सांगायचे म्हणजे जो माणूस या परिस्थितीचा फायदा घेऊन सहज मुंबईत मोक्याच्या जागी १०–१५ प्रशस्त फ्लॅटस् “पागडीवर” घेऊ शकला असता, त्याच्याजवळ निवृत्त झाल्यावर स्वतःच्या मालकीचे वनरुम किचन सुद्धा नव्हते. बाबाचा निवृत्तीनंतर कारवारलाच स्थाईक होण्याचा विचार होता.

काकांची गोष्ट तर विचारायलाच नको. तुम्हाला कल्पना असेलच काका काही काळ GOI चे Import Export विभागाचे Chief Controller होते. त्या १९६६ च्या काळात दर महिन्याला लाखो रुपये, Repeat दर महिन्याला लाखो रुपये, अगदी आरामात कमवू शकले असते. १९६६ साली सोन्याचा भाव रु. ८३.७५ ला १० ग्रॅम होता. त्यांना खुश करण्यासाठी ग्राहक वर्गाची कुठल्याही थराला जायची तयारी असे, याचे एक उदाहरण देतो.

लग्नानंतर आम्ही दोघे दिल्लीला काकांकडे काही दिवसांकरिता गेलो होतो. कधीही काहीही न स्वीकारणाऱ्या काकांनी खास आमच्याकरिता हॉटेल अशोकामध्ये एक डिनर इन्वीटेशन स्वीकारले. एका मोठ्या हॉलमध्ये जिथे कमीत कमी २०० लोकांना एकाचवेळी जेवण दिले जाते, तिथे आम्ही दोघे, काका–काकी आणि स्पॉन्सररचा फक्त एकच माणूस. फक्त ५ माणसांकरिता सबंध हॉल बुक केला होता आणि बुफे जेवण कमीत कमी २०० लोकांचे! किती हा पैशांचा अपव्यय आणि अय्याशीचा माज आणि मग्रुरी!

काका, महाराष्ट्र राज्याचे Chief Secrectory म्हणून निवृत्त झाले. मंत्रालयापासून अवघ्या ५०० मीटरवर असलेल्या “ललित” नावाच्या भव्य इमारतीमध्ये ते स्वतः स्पॉन्सरर असून सुद्धा केवळ काही हजार रुपयांचा हप्ता भरण्याची ताकद नसल्याने त्यांनी “ललित” सोडून देवनारला एक छोटेसे घर घेतले व निवृत्त झाल्यावर तेथेच स्थायिक झाले. माझ्या घरी महापंचमीची पूजा असताना काका–काकी ९० लिमिटेड बस पकडून पूजेला येत. का तर! देवनार ते चर्चगेट या लांबच्या प्रवासाला पेट्रोल खूप लागते आणि त्यांना ते परवडत नव्हते. स्वतःची जुनी फियाट स्वतःच चालवून आणण्यापेक्षा बस स्वस्त पडत होती.

माझ्या बाबा–काकांच्या आयुष्याची गाथा सद्ययुगांत एक दंतकथाच ठरेल. पण माझे असे ठाम मत आहे की, आपले कैक कारवारी ज्ञातिबांधवसुद्धा अतिशय उच्चश्रेणीचे, इमानदार, निस्पृह, यशस्वी प्रशासक होते उदाहरणच द्यायचे तर सर्वश्री महारुद्र वाघ, रमाकांत कुलकर्णी, पद्माकर दुभाषी, पुटप्पा नाडकर्णी, ॲड. जयंत नाडकर्णी, जस्टीस देवीदास पालेकर, रमाकांत महेश मुजुमदार, सुरेश शंकर नाडकर्णी, एच.ओ.सी. रसायनीचे निर्माते गजानन कसबेकर, सदाशिव तिनईकर, मधुसूदन कसबेकर आणि अनेक. माझा या सर्व पुण्यात्म्यांना मानाचा मुजरा!

## देवीकृपेची अनुभूती (४)

ही हकीकत १९६९ सालची आहे. भारतांत त्यावेळी तीन महत्त्वाचे स्टील उत्पादक होते. उदा. १) हिंदुस्थान स्टील लि., २) टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. आणि ज्या कंपनीत मी नोकरी करीत होतो ती ३) इंडियन आयर्न अँड स्टील कं. लि. स्टीलच्या वितरणावर कंट्रोल होता व प्रत्येक स्टील सेक्शनची किंमत शासनाने ठरविली होती. महिन्यातून एकदा आम्हा तिघांची, सिनीअर IAS ऑफीसर - आयर्न अँड स्टील कंट्रोलरशी मिटींग असे. या मिटींगमध्ये भाग घेण्यासाठी (महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) - महाराष्ट्रातील सर्वात मोठे स्टील ग्राहक म्हणून निमंत्रीत असत. त्यामुळे M.S.S.I.D.C. चे चेअरमन श्री. भाऊसाहेब नेवाळकरांशीही माझी चांगलीच मैत्री झाली होती.

या भाऊसाहेबांनी १९६५ च्या दरम्यान जवळजवळ रु ४५ लाख किंमतीची स्टील स्ट्रीप कॉईल्स हॉलंडहून स्वस्त मिळतात म्हणून आयात केली होती. पण सर्व स्ट्रीपस् Odd रुंदीच्या असल्यामुळे मालाची क्वालिटी उत्तम असून सुद्धा संपूर्ण माल ४ वर्षे तसाच पडून होता. त्यामुळे भाऊसाहेबांची प्रचंड गोची झाली होती. दरवेळी ते मला माल विकून देण्याची गळ घालत. गयावया करत, पण माझा नाईलाज होता. मी त्यांना सर्व स्ट्रीपस् G.P. Sheets बरोबर पॅकेज डिल मध्ये विकण्याचा सल्ला दिला होता. म्हणजे जो वितरक ह्या स्ट्रीपस् घेईल तो त्या स्ट्रीपस् कंट्रोल रेट पेक्षा कमी भावाने, नुकसानीत विकेल व G.P. Sheets विकून त्यात मिळालेल्या फायद्यातून स्वत:चे नुकसान भरुन काढेल व थोडाफार एकूण फायदा करेल. भाऊसाहेब पॅकेजडीलसाठीही तयार झाले होते. नेमक्या त्याच आठवड्यात श्री. म.वा. देसाई IAS, Industries Commissioner (मधुकाका) यांना भेटण्याचा योग आला. त्यांच्या कॅबिनमध्ये श्री. अगरवाल-सेक्रेटरी, अमीनचंद प्यारेलाल ग्रुप - यांच्याशी भेट झाली. बोलता बोलता स्ट्रीपस्चा विषय निघाला आणि श्री. अगरवालांनी सगळ्या odd size च्या स्ट्रीपस् कंट्रोल रेटने घेण्याची तयारी दाखविली.

माझ्या खुशीला पारावर नव्हता. ताबडतोब एका वितरकाला तयार केले व स्ट्रीपस्ची १०% किंमत रु. ४.५० लाख भरुन आम्ही १००% स्ट्रीपस् ताब्यात घेतल्या व भाऊ साहेबांनी बाकीची ९०% रक्कम ३ महिन्यांत भरण्याच्या माझ्या आश्वासनाला मान देऊन संपूर्ण माल आमच्या ताब्यांत दिला. परंतु विधीलिखाण वेगळेच होते. दरम्यान दोन दिवसांच्या अवधीत श्री. अगरवालांच्या लक्षात आले होते की, हा माल गेली चार वर्षे न विकता पडून होता. त्यांनी मला स्पष्ट सांगितले की, ते सर्व माल घ्यायला तयार आहेत, पण कंट्रोल रेट पेक्षा दर टनामागे रु. ३००/- कमी दराने! माझ्या डोळ्यासमोर काजवे चमकले. फायदा तर सोडूनच द्या. सर्व G.P. Sheets विकल्यावर सुद्धा आम्हाला थोडेफार नुकसानच होत होते. काहीच दुसरा मार्ग दिसत नसल्याने मी अगरवालसाहेबांनी दिलेली ऑफर मान्य केली. त्याबरोबर अगरवाल पुढे

म्हणाले की – पैसे तुम्हाला तीन महिन्यानंतरच मिळतील. माझे डोके फिरले. अगरवालांच्या कॅबिनमध्ये के. सी. कॉलेजच्या बाजूला असलेल्या A.P.J. हाऊसमध्ये मी त्यांना त्यांच्या समोरच म्हटले की, 'अगरवाल तुम्ही दगलबाज आणि धोकेबाज माणूस आहात. श्री. देसाईंसमोर तुम्ही मला एक वेगळे आश्वासन दिलेत आणि केवळ तुमच्या आश्वासनामुळेच मी या फंदात पडलो आणि आता अगदी वाईट तऱ्हेने फसलो गेलो आहे. तेव्हा मी शपथ घेतो की, तुम्ही आता याच स्ट्रीपस्‌ना डबल भाव देतो म्हटले तरी मी तुम्हाला एक किलो माल देणार नाही' –असे म्हणून बाहेर पडलो. मला माहीत होते अगरवालांना त्या स्ट्रीपस्‌ची खरेतर गरज होती पण केवळ आमच्या असहायतेचा ते फायदा घेण्यास बघत होते.

दुसऱ्या दिवशी पूजा करताना मी आई शांतादुर्गेला माझी सर्व कथा आणि व्यथा सांगितली. सबंध दिवस उपवास केला. असेच ४–५ दिवस गेले. सहाव्या दिवशी पूजा करताना एक विचार तरंगत माझ्या मनात आला की, तू त्या स्ट्रीपस्‌चे भिंतीत Concealed electric wiring करण्याकरिता Conduit pipes वापरतात ते तू का बनवत नाही ? ताबडतोब मी त्या वितरकाला एक पाईप बनवून घेण्यास सांगितले. अतिशय सुरेख पाईप बनला. कारण स्ट्रीपस्‌ची क्वालिटी खूपच छान होती (CRCA) सर्व पाईप्स हातोहात कंट्रोल रेटनेच विकले गेले व G.P. Sheets वर फायदा मिळाला तो निराळा. आम्ही सगळे चर्चगेटच्या मोतीमहलमध्ये आलो. आमच्या सगळ्या काळज्या मिटल्या. आमच्या आयुष्यांतील काळरात्रींचे, आई शांतादुर्गेने सहज तरंगत पाठविलेल्या त्या विचाराने, एका मंगल पहाटेंत रुपांतर झाले.

आई शांतादुर्गेचा महिमा जितका वर्णावा तितका कमीच !

**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२ ९१३६५/८७७९९८६६०६**
**arunkasby@gmail.com**

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| हर्षद प्रभाकर सुखटणकर, बोरीवली | व | नमीता मंगेश नाडकर्णी, वरळी |
| प्रशांत सुरेश तेलंग, अंकोला | व | माया पुरुषोत्तम भट, अंकोला |
| राधिका उदय नेत्रावळी, पारले | व | राहिल राकेश लवाना, मालाड |

## REMEMBERING SHRI SADANAND SHIVRAM SANZGIRI
## THE MAN WITH HEALING TOUCH

'Sadanand' The name, directly translating to mean "being happy forever", his birth in the village of Majali was the conception of joy and cheer to everyone around.

Despite a life strewn with struggles Sadanand and his three elder brothers along with a widowed mother managed to sail their way through the strife. He served under the Delhi Government as a labour commissioner and with his wife Nalini, he fathered two girls, Anjali and Sonia. His late father's boon of miraculously treating those ailing, was passed down to him, as he selflessly strove to help the sick and needy. His healing touch was just another feather in his cap. His nobility generosity and principles always set him apart. Marked by just hehaviour and unending wisdom, it would only appear cliched to compliment his sheer sense of judgement. No words are enough to describe the imprint he left in our lives and our heart. He left for his heavenly abode on 23rd July 2018. He will continue to live through all his teachings, during the meaningful time he spent with us.

**Mrs. Nalini Sanzagiri, Grant Road**

## महिलांचा स्नेहमेळावा : भगिनींस निमंत्रण

नेहमीचा श्रावणातला महिलांचा स्नेहमेळावा समारंभ यंदा जागेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

**जोगेश्वरी**

**तारीख** : शुक्रवार २३ ऑगस्ट

**स्थळ** : रामेश्वर मंदीर
सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू)

**वेळ** : संध्याकाळी ५ ते ७

**संघ कार्यकारिणी तर्फे**

जयश्री भेडसगांवकर, शांता पालेकर

**मुलुंड**

**तारीख** : रविवार ११ ऑगस्ट

**स्थळ** : सुयोग सोसायटी सभागृह, संत ज्ञानेश्वर पथ, मुलुंड, पूर्व ४०००८१

**वेळ** : संध्याकाळी ४ ते ८।।

**विशेष तपशील : पृ. १३ वर**

# निधन

| | | |
|---|---|---|
| उषा विनोद गायतोंडे | (अंकोला) | बोरीवली |
| (पूर्वाश्रमीच्या उषा मंगेश मुजुमदार) | | |
| हेमलता प्रभाकर जोशी | | |
| (पूर्वाश्रीमच्या दुर्गा (बेबी) शंकर मुझुमदार) | (अंकोला) | पुणे |
| अहिल्या (कस्तुरी) अनंत कसबेकर | (कडवाड) | कारवार |
| सुधीर सदानंद कसबेकर | (कडवाड) | कडवाड |
| राजेंद्र भालचंद्र कसबेकर | (कडवाड) | सदाशिवगड |
| प्रकाश त्र्यंबक कुलकर्णी | (किन्नर) | ठाणे |
| कुमुद शंकर नाडकर्णी | (अंकोला) | परळ |
| सदानंद रामकृष्ण नाडकर्णी | (सांवरपै) | कांदिवली |
| लक्ष्मीबाई दिगंबर नाडकर्णी | (बसुणगे) | फोंडा |
| मोहन नीलकंठ नेत्रावळी | (अंकोला) | जोगेश्वरी |
| महेश विश्वंभर पालेकर | (अर्गे) | माहीम |
| अलका नारायण (उह्लास) पिकळे | (अंकोला) | मालाड |
| इंदूमती गुरुदास फेणे | (चेंडीये) | पुणे |
| सुरेश गोविंद फेणे | (चेंडीये) | बोरीवली |
| नलिनी भालचंद्र स्थळेकर | (अंकोला) | अंधेरी |
| माधव भवानी तेलंग | (केरवडी) | दादर |
| शांता विश्वनाथ तेलंग | (हारवाडे) | अंधेरी |
| विनोदिनी दिगंबर तेलंग | (हारवाडे) | जोगेश्वरी |
| स्मिता (बेबी) मधुकर तेलंग | (बाड) | ठाणे |
| सतीश विनायक वाघ | (सदाशिवगड) | बंगळूर |
| कमल गोपीनाथ वाघ | (सदाशिवगड) | दादर |
| सुनीती मोहन वागळे | (अस्नोटी) | अंधेरी |
| शीला शरद वागळे | (अस्नोटी) | बोरीवली |
| उमा (रोहिणी) महेश वागळे | (बाड) | कळवा |
| शैलेश गणपत (गंपू) वागळे | (माजाळी) | अमेरिका |

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

## दिवंगत प्रेमानंद गायतोंडे यांच्या इच्छेनुसार आठ लाख रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. प्रेमानंद व्यंकटराव गायतोंडे हे शास्त्रीय संगीताचे जाणकार म्हणून परिचीत होते. त्यांचे गेल्या नोव्हेंबर २०१८ मध्ये अकस्मात निधन झाले. निधनापूर्वी आपल्या ज्ञातीसंस्थांना देणग्या द्यायची त्यांनी इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांच्या पत्नी वीणा (पूर्वाश्रमीच्या विजया कमलाकर (पोरी) वर्टी) यांनी अलीकडेच आठ लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील प्रत्येकी तीन लाख याप्रमाणे प्रेमानंद यांची मोठी बहीण हिंदु कॉलनी येथे राहणाऱ्या श्रीमती सिंधु माधव वागळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्धसेवानिधी व एज्युकेशन सोसायटी यांच्यासाठी आहेत व ऊर्वरीत दोन लाख रुपये वीणा यांच्यातर्फे श्री. प्रेमानंद गायतोंडे यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## श्री. अरुण कसबेकर यांच्यातर्फे विवाहाच्या ५५ व्या वाढदिवसासाठी अडीच लाख रुपयांची देणगी

आपल्या ज्ञातीचे एक हितचिंतक गेली १३ वर्षे वृद्धसेवानिधीसाठी सरासरी दरसाल निदान एकतरी भरघोस देणगी देत असतात. ३० मे २०१९ हा त्यांच्या विवाहाचा ५५ वा वाढदिवस. त्याप्रसंगी त्यांनी वृद्धसेवानिधीसाठी आणखी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. ती. मीरा गणपत वागळे या श्री. कसबेकर यांच्या आवडत्या आत्या! कसबेकरांच्या शाळेय शिक्षणापासून झालेल्या प्रगतीत आत्यांना नेहमी आनंदच वाटत असे आत्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ १ लाख रु.ची ही यांनी देणगी दिली आहे. विविध प्रसंगी त्यांनी दिलेल्या देणग्यांपैकी ही बावीसावी देणगी आहे व त्या सर्व देणग्यांची एकूण रक्कम ३६ लाख ५० हजार रुपये एवढी आहे.

त्याशिवाय त्यांनी अलीकडेच ज्ञातीतील डायलिसीसने बाधित असलेल्या तरुणीला पन्नास हजार रुपयांचे साहाय्य केले आहे.

विवाहाच्या ५५ व्या वाढदिवसाप्रसंगी कसबेकर दांपत्यांचे शुभचिंतन.

## श्रीमती नीला मुझुमदार व कुटुंबीयांकडून वृद्धसेवानिधीस एक लाख रुपयांची देणगी

गेल्या पिढींत श्री. पांडुरंग विनायक वाघ उर्फ नरहरी वाघ कोंकणी साहित्यांत रस घेणारे एक भाषाप्रेमी होऊन गेले. सध्याच्या ‘मुखपत्रिकेचे’ वडील भावंड म्हणजे संघातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या ‘शारदा’ या त्रैमासिकाच्या संपादक मंडळावर १९३८-१९४० दरम्यान ते कार्यरत होते. ‘शारदा’ मध्ये कोंकणी कविता, ग्यादी, लेख वगैरे साहित्य असे त्याचे ते संपादन करीत. १९३५ साली मुंबई येथील कोंकणी साहित्य संघातर्फे ‘वोंवळा’ हा कोंकणी लेखांचा संग्रह प्रसिद्ध झाला होता. त्यातील सर्वच्या सर्व १४ लेख हे आपल्या कारवारकर

ज्ञातिबांधवांचेच होते. त्यांत 'नरहरी' या टोपण नावाखाली त्यांचा 'गरीबालो संसार' हा एक लेख होता.

श्री. वाघ यांचे ११ एप्रिल १९६९ साली निधन झाले. त्यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कन्या श्रीमती नीला दिलीप मुझुमदार व कुटुंबीयातर्फे वृद्धसेवानिधीस श्री. वाघ व पत्नी श्रीमती सुंदर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक लाख रुपयांची देणगी मिळाली आहे.

## श्रीमती लीना दिलीप देसाई यांच्यातर्फे वैद्यकीय सेवा निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

पूर्वी पारले येथे राहणारे श्री. वासुदेव (मोहन) वैकंठ देसाई यांचे वंशज – निरनिराळ्या प्रसंगी संघाला उल्लेखनीय देणग्या देत असतात. कुर्ला येथे राहणाऱ्या त्यांच्या स्नुषा श्रीमती लीना दिलीप देसाई यांनी अलीकडेच वैद्यकीय सेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील पन्नास हजार रुपये पती श्री. दिलीप देसाई यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आहेत तर ऊर्वरीत पन्नास हजार रुपये त्यांची मावशी श्रीमती इंदू कमलाकर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ आहेत.

## श्री. भालचंद्र विनायक पालेकर यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

आपल्या संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थांचे कार्यवाह श्री. मंगेश भालचंद्र पालेकर यांची आई श्रीमती ताराबाई या गिरगांव येथे राहतात त्यांनी नुकतेच ९८ व्या वर्षात पदार्पण केले. तरीही त्या अद्याप 'नुसत्याचे रांदप' करु शकतात. त्यांनी आपले पती श्री. भालचंद्र विनायक पालेकर यांच्या स्मरणार्थ कुटुंबीयामार्फत वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्री नारायण मर्तोबराव मुझुमदार यांच्या पहिल्या पुण्यतिथीप्रसंगी समाजसेवानिधीसाठी ५०,००१ रुपयांची देगणी

अंधेरी (पू) येथे राहणारे श्री. नारायण मर्तोबराव मुझुमदार यांचे गेल्यावर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या पत्नी श्रीमती शैला व मुले निखील व दीपा यांनी समाजसेवानिधीसाठी ५०,००१ रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | एन्. के. जी. एस्. बी. को. ऑप बँकेकडून | १०,००० |
| २. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्ट कडून | ४,००० |
| ३. | श्रीमती नीना (सुमन)दिगंबर कसबेकर यांच्या १८ व्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. दिगंबर मारुती कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून | १,००१ |
| ४. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |

| | | |
|---|---|---|
| ५. | श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या २३ व्या पुण्यतिथी निमित्त नाती सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ६. | श्रीमती शिल्पा सुधीर वर्दे यांजकडून | २,००० |
| ७. | श्री. सदानंद कृष्णा देसाई यांजकडून | १२,००० |
| ८. | श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या २ ऱ्या पुण्यतिथी निमित्त | |
| | कन्या श्रीमती विद्या व जामात श्री. मनोज गोविंद भांडारकर यांजकडून | १०,००१ |
| | पत्नी श्रीमती शामल यांजकडून | ५,००१ |
| ९. | श्री. काशिनाथ त्रिबंक नाडकर्णी | २,००१ |
| | व श्रीमती गंगाबाई काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुंबीयांकडून | २,००१ |
| १०. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या मुलांकडून | ७,००१ |
| ११. | श्रीमती अनुराधा (निर्मला) बाळकृष्ण वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या बहिणींकडून | २,००१ |
| १२. | श्रीमती सुधा विश्वंभर कसबेकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. देवीदास यांजकडून | ११,००० |
| १३. | श्री. नारायण मर्तोबराव मुझुमदार यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती शैला व पुत्र श्री. निखील व कन्या कुमारी दीपा यांजकडून | ५०,००१ |
| १४. | श्रीमती राधाबाई (विठाई) व श्री. यशवंत त्र्यंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ | ५,००१ |
| १५. | श्रीमती इंदुमती सदानंद नाडकर्णी यांच्या ८७ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | ५,००१ |
| १६. | सविता सबनीस फाऊंडेशतर्फे श्री. केशव गजानन सबनीस यांच्या स्मरणार्थ | २,५०१ |
| | श्री. शंकर गजानन सबनीस यांच्या स्मरणार्थ | २,५०१ |
| १७. | श्रीमती इंदिराबाई व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. किशोर यांजकडून | २,००० |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती रमाबाई दत्तात्रय नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. दत्तात्रय रामचंद्र नाडकर्णी यांजकडून | ३,००० |
| २. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्रीमती सुंदर व श्री. पांडुरंग (नरहरी) विनायक वाघ यांच्या स्मरणार्थ श्री. पांडुरंग यांच्या ५० व्या पुण्यतिथी प्रसंगी कन्या श्रीमती नीला दिलीप मुझुमदार व कुटुंबीयांकडून | १,००,००० |
| ४. | श्रीमती शिल्पा सुधीर वर्दे यांजकडून | २,००० |
| ५. | श्री. त्रिबंक अनंत कसबेकर यांच्या ९१ व्या वाढदिसा प्रसंगी | |
| | पुत्र श्री. अनंत (योगेश) यांजकडून | १०,००१ |
| | कन्या श्रीमती भारती दिलीप पै. यांजकडून | १०,००१ |
| ६. | श्रीमती शांता (माई) व श्री. मंगेश (भाऊ) महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाहाच्या वर्षदिन प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सुभदा रमेश वागळे यांजकडून | १३,००० |
| ७. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या मुलांकडून | ७,००१ |
| ८. | श्री. भालचंद्र विनायक पालेकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती ताराबाई व कुटुंबीयाकडून | १,००,००० |
| ९. | श्रीमती सिंधु माधव वागळे यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. प्रेमानंद वेंकटराव गायतोंडे यांच्या इच्छेनुसार श्रीमती वीणा प्रेमानंद गायतोंडे यांजकडून | ३,००,००० |
| १०. | श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या १८ व्या पुण्यतिथी निमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| ११. | श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १०,००० |
| १२. | विवाहाच्या ५५ व्या वाढदिवसा प्रसंगी श्रीमती मंगला व श्री. अरुण भास्कर कसबेकर यांजकडून | १,००,००० |
| | आत्या श्रीमती मीरा गणपत वागळे यांचया स्मृतीप्रीत्यर्थ | १,००,००० |
| १३. | श्री. मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्य प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | २,००९ |
| १४. | श्रीमती रमाबाई त्र्यंबक कसबेकर यांच्या स्मरणार्थ नातू श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | ११,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दिलीप वासुदेव देसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती लीना यांजकडून | ५०,००० |
| २. | श्रीमती इंदू कमलाकर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ भाची श्रीमती लीना दिलीप देसाई यांजकडून | ५०,००० |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्रीमती शिल्पा सुधीर वर्दे यांजकडून | २,००० |
| ४. | श्रीमती प्रभा व श्री पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १०,००० |

## वास्तुफंडा करिता

| | | |
|---|---|---|
| १. | सार्वजनिक सभागृह ट्रस्ट कडून | १,३८२ |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | एन्. के. जी. एस्. बी को. ऑप बँकेकडून | १०,००० |
| २. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्ट कडून | ४,८०९ |
| ३. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ४. | श्री. देवीदास गोविंद बोरकर यांच्या स्मरणार्थ पुतण्या श्री. मिलींद दिनकर बोरकर यांजकडून | १,००१ |
| ५. | श्री. शशिकांत महारुद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ मिडल स्कूल स्कॉलर्शिप परीक्षेत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्यास बक्षीस देण्यासाठी पत्नी श्रीमती नीलिमा यांजकडून | १०,००० |
| ६. | श्री. शशिकांत महारुद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ हायस्कूल स्कॉलर्शिप परीक्षेत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्यास बक्षीस देण्यासाठी कन्या श्रीमती सुजाता विकास केणी यांजकडून | १०,००० |
| ७. | श्रीमती ललिता माधव वागळे यांच्या २२ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| ८. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या मुलांकडून | ७,००१ |
| ९. | श्रीमती अनुराधा (निर्मला) बाळकृष्ण वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या बहिणींकडून | २,००१ |
| १०. | श्रीमती राधा वेलंगी यांजकडून | २०,००० |
| ११. | डॉ. विनायक बाबुराव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मोरेश्वर यांजकडून | ५,००० |
| १२. | श्रीमती सिंधू माधव वागळे यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. प्रेमानंद वेंकटराव गायतोंडे यांच्या इच्छेनुसार श्रीमती डॉ. वीणा प्रेमानंद गायतोंडे यांजकडून | ३,००,००० |

| | | |
|---|---|---|
| १३. | श्री. प्रेमानंद वेंकटराव गायतोंडे यांच्या स्मरणार्थ<br>पत्नी डॉ. वीणा यांजकडून | २,००,००० |
| १४. | श्रीमती सुनीता सुरेश शहापूरकर यांच्या ५ व्या पुण्यतिथी निमित्त बंधु<br>श्री. अरुण कुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| १५. | श्री. माधव दत्तात्रय वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त<br>पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | १,००१ |
| १६. | श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्थ<br>हितचिंतकाकडून | १०,००० |
| १७. | श्रीमती कमल विश्वंभर गायतोंडे यांच्या १३ व्या पुण्यतिथीप्रसंगी<br>बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे याजकडून | १०,००० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती अपर्णा सदानंद देसाई | ठाणे | ५,००० |


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**



## विजूले चुटकुले

घोव (बायलेक) : अगो तूं आता खंय आसा?

बायल : हांव तुमगेल्या हृदयांत आसा

घोव : थंय आणि खूब बायलो उरतल्यो. तांचेकडेच झगडत रावनाका

विजय सदानंद वागळे, ठाणे
९२२१६०७५७७


www.kccgoa.in
कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद
अप्रतिम निसर्गाने नटलेलं
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा
मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मन:शांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.
फ्लॅटस् उपलब्ध: 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
प्रॉजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था
a Project by:
KCC
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/ 72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




For detailed information, visit nearest branch or www.nkgsb-bank.com

Customer Care : 022 2860 2000

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.